| MHGA070000482020 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | ०७.०१.२०२० |
| नोंदणी तारीख | ०७.०१.२०२० |
| निकाल तारीख | २१.०५.२०२६ |
| कालावधी | **०६ वर्षे, ०३ महिने, २७ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी –** ११ खाली |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,**<br>**पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **२९२/२०१९**<br>पोलिस स्टेशन, अहेरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | **०४.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २६/२०२०** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी, अहेरी ,<br>(फिर्यादी पो.हवा. काशिनाथ ढकलुजी दुधे) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपी | **किसन मुत्ता टेकुलवार,**<br>वय ४० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>राहणार – रामपुर, ता.अहेरी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **विधीज्ञ श्री. जैनवार**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २८.१०.२०१९ |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| पहिल्या खबरीची तारीख | २८.१०.२०१९ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०७.०१.२०२० |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | १७.०९.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १७.११.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०४.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | किसन मुत्ता टेकुलवार | | ०७.०१. २०२० | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियमचे कलम ६५(अ ), प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | मारोती लक्ष्मय्या धारणी (**निशाणी ११ खाली**) | मुददेमाल वाहक |
| सा.क्र. २ | काशिनाथ ढेकलुजी दुधे (**निशाणी ११ खाली**) | फिर्यादी |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी

अ. <u>अभियोग पक्ष</u>:

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–१२**/स.सा.क्र.०२ | फिर्याद |
| २. | निशाणी **पी–१३**/स.सा.क्र.०२ | छापिल नमुन्यातील खबर |
| ३. | निशाणी **पी–१४**/स.सा.क्र.०२ | घटनास्थळ जप्ती पंचनामा |
| ४. | निशाणी **पी–१५**/स.सा.क्र.०२ | मालमत्ता शोध जप्तीचा नमुना |

ड. <u>महत्त्वाच्या वस्तु</u>:

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २५२/२०१९ दि. | १.इम्परिअल बल्यु कंपनीचे ३७५ एम एल मापाचे विदेशी दारूचे १२ नगर सिलबंद बॉटला<br>२. इंडियाना ब्ल्यु ग्रेन विस्की कंपनीचे १८० एमएल मापाचे विदेशी दारूचे ८० नग सिलबंद निपा |

## न्यायनिर्णय

(दिनांकः ०४ मे, २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक २८/१०/२०१९ रोजी दुपारी ०३.०० ते ०३.०० वाजताचे दरम्यान मौजा–ओडीगुडम प्राणहिता नदीघाट रस्त्यावर आरोपी एका नायलॉन थैलीमध्ये इंम्परिअल ब्ल्यु व्हीस्की कंपनीच्या ७५० मिली मापाच्या १२ निपा व दुस–या थैलीमध्ये इंडीयाना ब्ल्यु ग्रेण व्हीस्की कंपनीच्या १८० मिली मापाच्या ८० निपा दारू , अवैद्यरित्या विनापरवाना बाळगुन वाहतुक करिता असतांना मिळुन आला. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने तिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.११ खाली नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक २८/१०/२०१९ रोजी दुपारी ०३.०० ते ०३.०० वाजताचे दरम्यान मौजा–ओडीगुडम प्राणहिता नदीघाट रस्त्यावर आरोपी त्याच्या हातात एका नायलॉन थैलीमध्ये इंम्परिअल ब्ल्यु व्हीस्की कंपनीच्या ७५० मिली मापाच्या १२ निपा व दुस–या थैलीमध्ये इंडीयाना ब्ल्यु ग्रेण व्हीस्की कंपनीच्या १८० मिली मापाच्या ८० निपा दारू विनापरवाना बाळगुन वाहतुक करिता असतांना मिळुन आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिताः**

२.  आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने केवळ दोन साक्षीदार तपासले.

३.  साक्षीदार क्र.१ **मारोती लच्मय्या धारणी** यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, त्यांनी गुन्हा क्र.२५२/२०१९ मधील मुददेमाल दि.३१.१०.२०१९ रोजी ते अहेरी पोलीस ठाणयत कार्यरत असतांना डयुटी लागल्याप्रमाणे नागपुर येथील प्रयोगशाळेत दाखल केला होता. त्याबाबत त्यांनी पोचपावती घेतली होती. त्यांनी दि.०१.११.२०१९ रोजी परत आल्यावर ती पोचपावती मोहरर यांच्याकडे जमा केली. तपासी अधिकारी त्यांनी जबाब घेतला होता. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, शासकीय कामासाठी जातांना प्रवासाचा लेखी पास मिळतो. तो त्यांनी तपासी अधिकारी यांना दिला होता. त्यांनी ताबा पावती देखील तपासी अधिका–याला दिली होती. त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले.

४. सा.क्र.२ **काशिनाथ ढेकलुजी धारणे** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२८.१०.२०१९ रोजी ते पोलीस स्टेशन अहेरी येथे कार्यरत होते. ते पोलीस स्टेशनला कार्यरत असतांना खबर मिळाली की, मौजा ओडीगुडम रामपुर प्राणहिता नदीघाट येथे एक इसम तेलंगणा राज्यातुन दारू घेवून येत असल्याची खबर मिळाल्याने ती स्वत: व सोबत पोलीस हवालदार घाटघुमर व दोन सैनिक असे पोलीस स्टेशन अहेरीमधुन रवाना झाले. मौजा रामपुर येथे दोन पंचाना सोबत घेवून प्राणहिता नदीघाटचे रस्त्यावर दबा धरून बसले. त्यानंतर एक इसम थैलीत काहीतरी घेवून येतांना दिसला. त्याला थांबवून त्याच्या थैलीची पाहणी केली असता थैलीमध्ये ३७५ मिलीच्या १२ बॉटला व १८० मिलीची विदेशी दारू इंम्परिअल ब्ल्यु कंपनीच्या ८० निपाचा माल मिळून आला. पंचासमक्ष पंचनामा केला. मिळालेल्या बाटल्या सि.ए.करिता मोक्यावर सिलबंद केल्या. मालमत्ता शोध जप्तीपंचनामा तयार केला. त्यानंतर लेखी फिर्याद नि.क्र.१२, छापील प्रथम खबर नि.क्र.१३, घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१४, मालमत्ता शोध जप्तीचा नमुना नि.क्र.१५ आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

५. दोन्ही पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले तसेच साक्षदार हे पोलिस कर्मचारी आहे. जोपर्यंत त्यांचे साक्षेला इतर स्वतंत्र साक्षीदार दुजोरा करत नाही तोपर्यत आरोपीस दोषी ठरविणे उचित होणार नाही. सदर प्रकरणात जप्त केलेली दारू असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा

सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हा सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**मुद्दा क्र.२ करिताः**

७. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र. २ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. आरोपी **किशन मुत्ता टेकूलवार,** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(अ) नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. जप्त मुददेमाल नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.04 17:51:26 +0530

(एस.एम.एच.शाहिद)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी

दि.०४.०५.२०२६